## नियमित दिवाणी दावा क्र. ४४/२०१६ मधील नि.५ वरील आदेश

वादीने प्रस्तूत अर्ज आदेश ३९ नियम १ आणि २ दिवाणी प्रक्रियासंहिता प्रमाणे प्रतिवादींविरूध्द तूर्तातूर्त मनाई ताकीद मिळणेकरिता दाखल केला आहे.

२. वादी कथन करतात की, मौजे मडिलगे ता.आजरा जि. कोल्हापूर येथील जमिन गट क्र.३११ एकूण क्षेत्र ३ हे.८५.५ आर पैकी ०हे ४८.२ आर चतु:सिमापूर्वक क्षेत्र म्हणजे दावा मिळकत आहे. वादी यांनी प्रस्तूत वाद मिळकत प्रतिवादी क्र.१ ची पत्नी यांचेकडून दि.१६.३.२००४ च्या नोंदणीकृत खरेदी दस्ताने खरेदी केली. सदर खरेदीपत्रानुसार वादी यांचे नाव ७/१२ पत्रकी नोंद होउन सदर खरेदी दिनांकापासून वादी वाद मिळकतीमध्ये कब्जे वहिवाटीत आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दि.२५.५.२०१६ रोजी वादी यांना वाद मिळकतीमध्ये बोअर मारत असताना हरकत अडथळा केला त्यामुळे प्रस्तूत दावेस कारण होउन तूर्तातूर्त मनाई अर्ज दावेसमवेत दाखल केला. प्रतिवादी यांचा वाद मिळकतीशी कोणताही संबंध नाही. त्यामुळे तुर्तातूर्त मनाई अर्ज मंजूर करावा अशी वादी विनंती करतात.

३. प्रतिवादी क्र.१ आणि २ यांना वारंवार संधी देउनही त्यांनी प्रस्तूत अर्जास म्हणणे दाखल केलेले नाही.

४. प्रतिवादी क्र.३ आणि ४ त्यांचे वकीलांमार्फत हजर होउन

प्रस्तूत दावेकामी आणि अर्जाकामी म्हणणे आणि युक्तीवाद वारंवार संधी देउनही करू शकले नाहीत.

५. वादी विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

६. दाव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तूत दावा कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी नि.३ समवेत अनु.क्र.१ ला वाद मिळकतीचा ८अ उतारा अनु.क्र.२ ला ७/१२ उतारा अनु.क्र.३ ला फेरफार क्र.१७२२ आणि अनु.क्र.४ ला खरेदीपत्राची छायांकीत प्रत दाखल केली आहे. नि.३ अनु.क्र.२ चे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादी क्र.१ चे नाव ७/१२ पत्रकी वाद मिळकतींचे क्षेत्रास नोंद आहे. प्रस्तूत वादीचे नाव फेरफार क्र.१७२२ मंजूर झालेप्रमाणे नोंद असल्याचे निदर्शनास येते. फेरफार क्र.१७२२ हा नि.३ अनु.क्र.४ चे खरेदीदस्तानुसार मंजूर झाल्याचे निदर्शनास येते. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी यांनी कोणतेही म्हणणे अथवा तूर्तातूर्त मनाई अर्जाकामी पुरावा दाखल केलेला नाही. अभिलेखावरील दाखल कागदपत्रांवरून असे निदर्शनास येते की, वादी यांची वाद मिळकतीमध्ये मालकी कब्जे वहिवाट आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी केस वादी यांचे लाभात निदर्शनास येते. प्रथमदर्शनी केस वादी यांचेकडे असलेने सोयीचा तूळ देखील वादी यांच्याकडे आहे. प्रस्तूतचा अर्ज नामंजूर केल्यास वादी यांचे नुकसान होउ शकते. याउलट प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी किंवा त्यांच्यातर्फे कोणीही इसम यांनी वादीच्या

दावा मिळकतीतील शांततामय कब्जेवहिवाटीस दाव्याच्या निकालापावेतो हरकत अडथळा करू नये अशी त्यांना तुर्तातूर्त मनाई ताकीद देणेत येते.

दिनांक—१७.४.२०१८

(के.के.खोमणे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
आजरा

## Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment are same,word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | :Sou.R.N.Kulkarni |
| Court | :Civil Court Jr.Dn.Ajara |
| Date | :17.04.2018 |
| Judgment signed by the Presiding Officer on | :17.04.2018 |
| Judgment uploaded on | :.18-04.2018 |